**अटी व शर्ती :-**

1. सोनोग्राफी मशीन/इमेजिंग मशीन निर्लेखन करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे Consent to establish व Consent to operate असणे बंधनकारक आहे.

2. निर्लेखन करताना निर्माण होणा-या ई-वेस्टचे व्यवस्थापन महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळाच्या नियमानुसार करण्यात यावे.

3. मशीन निर्लेखन करण्यासाठी लागणारा खर्च हा संबंधित सोनोग्राफी केंद्रधारक हे करतील (ठरल्याप्रमाणे दर आकारण्यात यावा) महानगरपालिका कुठल्याही प्रकारचा खर्च करणार नाही.

4. सोनोग्राफी केंद्र धारकाने मशीन निर्लेखन बाबतची निर्लेखन समितीची परवानगी घेतल्यावरच त्या मशीन निर्लेखनास पात्र ठरतील.

5. ई-वेस्ट एजन्सीधारकाने सोनोग्राफी मशीन निर्लेखन प्रक्रियेचा संपूर्ण व्हिडीओ हा पेनड्रायव्हमध्ये महानगरपालिकेत आरोग्य विभागास देणे बंधनकारक राहित.

6. मशीन निर्लेखनाच्या वेळेस कुठल्याही प्रकारे पीसीपीएनडीटी कायदयाचा भंग होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

7. समुचित प्राधीकारी पीसीपीएनडीटी यांच्या परवानगी शिवाय मशीन सोनोग्राफी केंद्रातून स्थलांतर होणार नाही.

8. मशीन निर्लेखन करताना प्रदुषणाचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

9. मशीन निर्लेखनाबाबत चा मासिक अहवाल मनपा आरोग्य विभागास देणे बंधनकारक राहिल.

10. निर्लेखन समिती महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरा प्रमाणेच सोनोग्राफी केंद्रधारका कडून दर आकारण्यात यावे. या बाबत सोनोग्राफी केंद्र धारकाची कुठल्याही प्रकाराची तक्रार खपवून घेतली जाणार नाही.

11. निर्लेखन करण्याची रक्कम ही संबधीत सोनोग्राफी केंद्रधारक अदा करतील. याकरिता महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर कोणताही खर्च करणार नाही.

